सावित्रीबाई फुले
पुणे विद्यापीठ
मराठी विभाग
गणेशखिंड, पुणे-४११००७

दूरध्वनी :
कार्यालय : ०२०-२५६० १३ ४२
विभागप्रमुख : ०२०-२५६० १३ ४१
फॅक्स : २५६९ ०५ १०
तार : /युनिपुना

पत्रांक : मराठी /
दिनांक : / /

## पीएच.डी. प्रवेशप्रक्रियाः २०१४-२०१५

**सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या मराठी विभागाशी संलग्न असलेल्या संशोधनमार्गदर्शकांसाठी सूचनाः**

१. इ. स. २०१४-२०१५ साठी पीएच.डीं. प्रवेशप्रक्रिया सुरू करण्यात येत आहे. त्याबाबतचे सविस्तर पत्र शैक्षणिक प्रवेश विभागाने २६/९/२०१४ रोजी विद्यापीठाच्या संकेतस्थळावर (होमपेजवर) ***Ph.D.ADMISSION 2014-15*** ह्या लिंकवर अपलोड केले आहे.

२. सदर पत्राचा आशय लक्षात घेऊन संशोधनमार्गदर्शकांनी इ. स. २०१३-१४ मध्ये रिक्त असलेल्या, तसेच नव्याने रिक्त झालेल्या जागांची प्रवर्गनिहाय अद्ययावत माहिती वरील पत्रासोबत जोडलेल्या दोन परिशिष्टांमधील तक्त्यांमध्ये भरून ती मराठी विभागाच्या ***marathi@unipune.ac.in*** ह्या ई-मेलवर १३ ऑक्टोबर २०१४ (सोमवार) पर्यंत पाठवावी. ह्या मुदतीनंतर आलेली माहिती स्वीकारली जाणार नाही.

३. संशोधनमार्गदर्शकांना जास्तीत जास्त दोनच संशोधन केंद्रांशी संलग्न राहता येईल व दोन्ही संशोधन केंद्रांचे मिळून जास्तीत जास्त आठच संशोधनविद्यार्थी घेता येतील. आठ विद्यार्थ्यांपैकी चार जागा खुल्या प्रवर्गासाठी, तर उर्वरित ४ जागा मागास प्रवर्गासाठी असतील. मागास प्रवर्गासाठीच्या जागांची विभागणी स्थूलमानाने एस. सी. -१, एस. टी. -१, डी. टी. /एन. टी.-१, अन्य- १ अशी असावी.

४. पीएच. डी. बाबतच्या सर्व प्रक्रियांबाबत संशोधनमार्गदर्शकांनीच स्वतःहून अद्ययावत राहून विभागाला सहकार्य केल्यास भावी काळात संशोधनाचा दर्जा उंचावता येईल.

डॉ. अविनाश आवलगावकर
प्राध्यापक व पीएच. डी. समितीप्रमुख

अविनाश सांगोलेकर
30.9.2014
(डॉ. अविनाश सांगोलेकर)
प्राध्यापक व प्रमुख
प्राध्यापक व प्रमुख
मराठी विभाग
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
पुणे-४११००७.

मराठी विभाग,
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे - ४११००७

Annexure-A व Annexure-B यांची MS Excel Format ची भरलेली सॉफ्ट कॉपी सोबत जोडली आहे. तीत आपली माहिती भरून स्वतः च्या ई-मेल आय डी वरून मराठी विभागा-च्या ई-मेल आय डी वर त्वरित पाठवावी.